# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः16.12.2025** **वारःमंगळवार**

---

१.पंतप्रधान नरेंद्र मोदींची जॉर्डनचे राजे अब्दुल्ला दुसरे इब्न अल हुसेन यांच्याशी अम्मान येथे द्विपक्षीय चर्चा

२. काँग्रेसच्या सभेत पंतप्रधानांबद्दल अपशब्द वापरल्याप्रकरणी संसदेत गदारोळ, विद्यापीठं आणि अन्य उच्च शिक्षण संस्थांना अधिकार देण्यासंबंधीचं विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे वर्ग

३. महाराष्ट्रातल्या 29 महापालिकांच्या निवडणुकांचं वेळापत्रक जाहीर, १५ जानेवारीला मतदान तर १६ जानेवारीला मजमोजणी

आणि

४. पहलगाम दहशतवादी हल्ल्याप्रकरणी NIA कडून सात जणांविरुद्ध आरोपपत्र दाखल

**<u>पीएमजॉर्डन</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल अम्मान इथं जॉर्डनचे राजे अब्दुल्ला दुसरे इब्न अल हुसेन यांच्याशी शिष्टमंडळस्तरीय चर्चा केली. या चर्चेच्या रुपानं भारत आणि जॉर्डन यांच्यातील राजनैतिक संबंधांना ७५ वर्ष पूर्ण होत असल्याच्या पार्श्र्वभूमीवर त्यांनी उभय देशांमधली निकटची भागीदारी अधोरेखित केली.

या वेळी दोन्ही नेत्यांनी व्यापार, गुंतवणूक, संरक्षण, नवीकरणीय ऊर्जा, खतं आणि शेती, माहिती तसंच डिजिटल तंत्रज्ञान, अत्यंत महत्त्वाची खनिजं अशा विविध क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवण्यासंदर्भात चर्चा केली. दहशतवाद, अतिरेक, मूलतत्तववादाच्या विरोधात जॉर्डनच्या खंबीर भूमिकेची पंतप्रधानांनी प्रशंसा केली. दहशतवादाचा मुकाबला करण्याबाबत भारत आणि जॉर्डनचा दृष्टिकोन सारखाच असल्याचंही मोदींनी नमूद केलं. पंतप्रधानांच्या या जॉर्डन भेटीत दोन्ही देशांमध्ये पाच सामंजस्य करार निश्चित करण्यात आले. पंतप्रधान आज त्यांच्या दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी जॉर्डन -भारत व्यवसाय मंचाच्या बैठकीत सहभागी होतील. त्यानंतर ते त्यांच्या दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात संध्याकाळी इथिओपियाची राजधानी अदिसअबाबा इथं पोहोचतील. त्यांच्या या देशाच्या दोन दिवसांच्या भेटीत ते त्यांचे इथिओपियाचे समपदस्थ डॉक्टर अबिय अहमद अली यांच्याशी द्विपक्षीय संबंधांच्या सर्व पैलूंवर चर्चा करतील. ग्लोबल साऊथमधील भागीदार म्हणून उभय देशांमधील मैत्रीचे संबंध बळकट करण्यास आणि द्विपक्षीय सहकार्य वाढवण्यास कटिबद्ध असल्याचा या भेटीच्या निमित्ताने पुनरुच्चार केला जाणार आहे.

**<u>संसदगोंधळ</u>**

काँग्रेसच्या नवी दिल्लीत झालेल्या रॅलीमध्ये, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य करण्यात आल्याचा आरोप राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सदस्यांनी काल संसदेत केला. या आक्षेपार्ह वक्तव्याबद्दल काँग्रेस नेतृत्वानं माफी मागावी, अशी मागणी सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी केली. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी लोकसभेत तर जे. पी. नड्डा यांनी राज्यसभेत हा मुद्दा उपस्थित केला. यावरून झालेल्या गदारोळामुळे दोन्ही सभागृहांचं कामकाज काही वेळ तहकूब करण्यात आलं.
कामकाज सुरू झाल्यावर लोकसभेत कायदा रद्द करणं आणि दुरुस्ती विधेयक, अणुउर्जेचा शाश्वत वापर आणि प्रगती विधेयक तसंच विकसित भारत शिक्षा अधिष्ठान विधेयक सादर झालं. अध्यापन, अध्ययन, संशोधन आणि नवोन्मेष यामध्ये उत्कृष्टता प्राप्त करण्यासाठी विद्यापीठं आणि अन्य उच्च शिक्षण संस्थांना अधिकार देणं हा या विधेयकाचा उद्देश आहे. शिक्षा विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्याचा निर्णय लोकसभेनं घेतला. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी लोकसभेत हे विधेयक सादर केलं. लोकसभेत काल एक लाख कोटी रुपयांहून अधिक रकमेच्या पुरवणी मागण्यांनाही मंजुरी देण्यात आली.

सीतारामन

तीन पूर्णांक दोन दशांश टक्के या जागतिक विकास दराच्या तुलनेत आठ पूर्णांक २ दशांश टक्के दर असलेला भारत ही जगातली सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था बनत असल्याचं अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल सांगितलं. लोकसभेत काल २०२५-२६ च्या पुरवणी अनुदान मागण्यांना उत्तर देताना अर्थमंत्री म्हणाल्या की, प्रत्येक जागतिक संस्था विद्यमान आर्थिक वर्षासाठी देशाच्या विकास दराच्या अंदाजात वाढ करत आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या देशाच्या अर्थव्यवस्थेबद्दलच्या नकारात्मक वक्तव्यावर प्रतिक्रिया व्यक्त करण्याची मागणी करणाऱ्या विरोधकांवर टीका करताना, अर्थमंत्र्यांनी डीबीआरएस, एस अँड पी आणि आर अँड आय या तीन प्रमुख जागतिक संस्थांनी भारताच्या क्रमवारीत सुधारणा केल्याचं स्पष्ट केलं तसंच भारतानं टीकाकारांना चुकीचं सिद्ध केलं आहे, असंही पुढे नमूद केलं.

बेरोजगारीदर

नोव्हेंबरमध्ये भारताचा बेरोजगारी दर कमी होऊन चार पूर्णांक सात दशांश टक्क्यांवर आला. १५ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या व्यक्तींच्या बेरोजगारीचा एप्रिलनंतरचा हा सर्वात नीचांकी दर आहे. सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या मासिक कार्यबल आकडेवारीतून ग्रामीण भागातील बेरोगारी दर 3पूर्णांक 9 दशांश टक्क्यांवर तर शहरी भागाचा साडेसहा टक्क्यांवर आल्याचं दिसून आलं आहे.

राष्ट्रपतीदौरा

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून सात दिवस कर्नाटक, तामिळनाडू आणि तेलंगण या तीन राज्यांचा दौरा करणार आहेत. आज राष्ट्रपतींच्या हस्ते कर्नाटकात मलवल्ली इथं आदी जगद्गुरू श्री शिवरात्रीश्र्वर शिवयोगी महास्वामीजींच्या एक हजार ६६ व्या जयंती सोहळ्याचं उद्घाटन करण्यात येणार आहे.

**<u>राष्ट्रपतीनकार</u>**

दरम्यान पश्चिम बंगालमधल्या राज्य विद्यापीठांचं कुलपतीपद राज्यपालांच्या ऐवजी मुख्यमंत्र्यांना देण्याचा प्रस्ताव असलेलं विधेयक राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी नामंजूर केलं आहे. पश्चिम बंगालच्या राज्यपालांनी २० एप्रिल २०२४ रोजी हे विधेयक राष्ट्रपतींच्या विचारार्थ राखून ठेवलं होतं.

**<u>महापालिकानिवडणूक</u>**

बृहन्मुंबई, पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिकेसह महाराष्ट्रातल्या 29 महापालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीचं वेळापत्रक राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत जाहीर केलं. त्यानुसार राज्यातील सर्व २९ महापालिकांसाठी येत्या १५ जानेवारीला मतदान आणि १६ जानेवारीला मजमोजणी होणार आहे. या सर्व महानगरपालिका क्षेत्रांमध्ये कालपासून आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणुकीसाठीची अधिसूचना गुरुवारी प्रसिद्ध होणार आहे. त्यानंतर येत्या २३ ते ३० डिसेंबरपर्यंत केवळ ऑफलाइन पद्धतीनं उमेदवारी अर्ज भरता येतील. अर्जनची छाननी ३१ डिसेंबरला होईल, २ जानेवारीपर्यंत अर्ज माघारी घेता येतील आणि ३ जानेवारीला अंतिम उमेदवार यादीसह चिन्हवाटप होईल. १५ जानेवारीला मतदान तर १६ जानेवारीला मतमोजणी होईल.

मुंबई वगळता इतरत्र बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीनं निवडणूक होईल. २९ महापालिकांमधल्या एकंदर 893 प्रभागतील २ हजार ८६९ जागांसाठी ही निवडणूक होत आहेत. या निवडणुकीत तीन कोटी ४८ लाखांहून अधिक मतदार असून त्यांच्यासाठी ३९ हजार १४७ मतदान केंद्रं कार्यरत असतील.

**<u>मतदारयाद्या-पूल-मंजिरी</u>**

मतदारयाद्यांच्या विशेष पुनरीक्षण कार्यक्रमाच्या अर्थात SIR च्या पहिल्या टप्प्यातील मतदार यादीचा मसुदा आज पश्चिम बंगालमध्ये प्रकाशित होणार आहे. मतदार यादीचा मसुदा प्रकाशित होण्यापूर्वी, आयोगानं राज्यातील विविध विधानसभा मतदारसंघांमधील कामाची छाननी करण्यासाठी विशेष मतदार यादी निरीक्षकांची नियुक्ती केली आहे.

**<u>विजयदिवस-प्रेसनोट</u>**

१९७१मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यातल्या युद्धाच्या ऐतिहासिक विजयाची आठवण जपणारा विजय दिन आज देशभरात साजरा केला जात आहे.

विजय दिवसाच्या निमित्तानं काल भारतीय सैन्यातर्फे नवी दिल्लीतील आर्मी हाऊस इथं “विजय दिवस ॲट होम” कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या कार्यक्रमाला उपस्थित होत्या. यावेळी देशांतर्गत विकसित तंत्रज्ञान आणि सैन्यदलाच्या विशेष क्षमतांचं प्रदर्शन आयोजित करण्यात आलं होतं. विजय दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र  आणि गृहमंत्री अमित शहा यांनी या युद्धात आपले प्राण अर्पण केलेल्या तसंच त्यामध्ये लढलेल्या शूर वीरांना अभिवादन केलं आहे.

**<u>एनआयएआरोपपत्र</u>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याप्रकरणी राष्ट्रीय तपास यंत्रणेनं काल जम्मू इथल्या एनआयए विशेष न्यायालयासमोर एकंदर सात आरोपींविरुद्ध आरोपपत्र दाखल केलं. लष्कर-ए-तैयबा आणि द रेझिस्टन्स फ्रंट या दोन दहशतवादी संघटनांवरही एनआयएनं आरोप लावले आहेत. १५००पेक्षा जास्त पानांच्या या आरोपपत्रात पाकिस्तानी दहशतवादी साजिद जट्ट याच्यासह ऑपरेशन महादेवअंतर्गत सुरक्षादलांच्या कारवाईत ठार झालेल्या तीन दहशतवाद्यांचाही आरोपपत्रात समावेश आहे.

**<u>क्रिकेट</u>**

19 वर्षाखालील आशिया चषक क्रिकेटमध्ये, भारताची लढत आज मलेशियाबरोबर होणार आहे.आज दुबईच्या सेवन्स स्टेडियममध्ये भारतीय वेळेनुसार सकाळी साडे दहा वाजता सामना सुरू होईल. रविवारी झालेल्या दुसऱ्या सामन्यात भारतानं पाकिस्तानला पराभूत केलं होतं. एकंदर आठ आशियाई संघ दोन गटांमध्ये स्पर्धा करत असून यजमान संयुक्त अरब अमिरातीसह, भारत, पाकिस्तान आणि मलेशिया अ गटात आहेत तर बांगलादेश, श्रीलंका, अफगाणिस्तान आणि नेपाळ ब गटात आहेत. अंतिम सामना येत्या रविवारी होणार आहे.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.